# Nayak's Tutorials

दिनांक : October 2024 | **Home Assignment Series** | गुण : ८०

वर्ग : १० वी (I.C.S.E ) | मराठी | वेळ : ३ तास

**Portion :-**
**कथाकुंज** – दोन मेघ, दुधावरची साय, अंगणातला पोपट, बेघर, शाळा, माणसाची गोष्ट, सरीस फुटते हास्य उन्हाचे, चोरी, उजव्या सोंडेचा गणपती, वेग, दोघी, पुण्य/ **काव्यांगण** – सायंकाळची शोभा, मन, श्रावणमास, प्रेमाचा गुलकंद, आई, किती तरी दिवसांत, माझ्या पाठच्या बहिणी, जिथे राबती हात, पैठणी, पालखीचे भोई, झाडे लावू, माझा मराठीचा बोल/ **करुणाष्टक** – संपूर्ण पाठ्यपुस्तक/ **रंगस्पर्श** – संपूर्ण पाठ्यपुस्तक **& व्याकरण & लेखन**

*Answers to this Paper must be written on the paper provided separately.*
*You will not be allowed to write during the first 15 minutes.*
*This time is to be spent in reading the question paper.*
*The time given at the head of this Paper is the time allowed for writing the answers.*

***Section A** is compulsory - **All** questions in **Section A** must be answered.*
*Attempt **any four** questions from **Section B**, answering at least one question each from the two books you have studied and **any two** questions from the same books you have studied.*
*The intended marks for questions or parts of questions are given in brackets [ ].*

## SECTION - A

*(Attempt **all** questions from this **Section**.)*

**Question 1**

Write a short composition in **Marathi** of approximately **250** words on any **one** of the following topics :- [15]

खालील दिलेल्या विषयांपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे **250** शब्दांचा **मराठीत** संक्षिप्त निबंध लिहा :-

(i) सकाळ झालीच नसती तर ............. कल्पना करा आणि आपले विचार लिहा, किंवा त्यावर आधारित गोष्ट लिहा.

(ii) आपल्या आयुष्यात अनेक प्रसंग घडतात. काही चांगले तर काही वाईट असतात. काही गमतीचे तर काही मजेदार प्रसंग घडतात. कधीकधी आपली झालेली फजिती आपल्या कायमची लक्षात राहून जाते. अशाच एखादया फजितीच्या मजेशीर प्रसंगाचे वर्णन करा.

(iii) नाटक पाहण्याची मजा काही निराळीच असते. त्यातून आपल्या मित्र/मैत्रिणींबरोबर नाटक पाहण्याची मजा काही वेगळीच असते. तुम्ही असे कोणते नाटक पाहिले आहे ते सांगून ते नाटक का आवडले ते लिहा.

(iv) प्रत्येकाने कधी ना कधी सर्कस पाहिली असेलच. सर्कशीच्या गमतीजमती पाहून तुम्हाला मजा वाटली असेल. त्या सर्कशीच्या आठवणी तुमच्या शब्दांत वर्णन करा.

(v) पुढे दिलेले चित्र पहा व त्या आधारे आपल्या मनात कोणते विचार येतात – त्याचे वर्णन करा.



**Question 2**

Write a letter in **Marathi** of approximately **120** words on any one of the topics given below :- [7]

खालील दिलेल्या विषयापैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे **120** शब्दांपर्यंतचे पत्र **मराठीत** लिहा :-

(i) तुमच्या मित्र / मैत्रिणीच्या वडिलांची बदली झाल्यामुळे त्याने / तिने दुसऱ्या शाळेत प्रवेश घेतला. त्याबद्दल चौकशी करणारे पत्र लिहा.

(ii) तुमच्या विभागात पाण्याचा पाईप फुटला आहे. त्यामुळे सर्व लोक त्रासून गेले आहेत त्याबद्दलची तक्रार संबधित अधिकाऱ्यांकडे करा.

**Question 3**

Read the passage given below and answer in **Marathi** the questions that follow, using your own words as far as possible :-

खाली दिलेल्या उतारा नीट काळजीपूर्वक वाचा आणि त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे तुमच्या स्वतःच्या शब्दांत **मराठीत** लिहा :-

आटपाट नगर होते. तिथला सत्यशील राजा सुख-समृद्धी व प्रजेची काळजी घेऊन राज्य करीत होता. राज्यात सर्वत्र आबादीआबाद होते. प्रजाही खाऊन पिऊन सुखी होती. जणू त्याला दृष्ट लागावी असे विपरित घडले. लागोपाठ दोन वर्षे राज्यावर वरूण राजाने अवकृपा केली. पाऊस पडलाच नाही. अवर्षणामुळे गुरे-ढोरे, झाडे-वेली, शेते, प्राणी व सर्व प्रजा हैराण झाली. राजाकडे गाऱ्हाणे गेले. राजाने सर्व विद्वानांना, ज्योतिषाचार्यांना, पंडितांना यावर उपाय विचारला. एका वयोवृद्ध ज्ञानी पंडिताने सर्वांशी सल्लामसलत करून सांगितले की, “गावातील शिव मंदिरातील शिव - पिंडी दुधात बुडवा म्हणजे हे अरिष्ट टळेल.” राजाने राज्यात ताबडतोब दवंडी पिटवली, “उद्या सोमवारी सकाळी सर्वांनी आपापल्या घरातील सर्व दूध घेऊन अभिषेक पात्रात ओतावे.” राजाज्ञाच ती ! आपापल्या घरातील सर्व दूध घेऊन हंड्या कळशांत भरून मंदिरासमोर रांगा लावल्या. मंदिरात यज्ञ-याग, पूजा-अर्चा, मंत्र-घोष, भजने - प्रार्थनांचा जल्लोश होत होता.

रांगा संपत आल्या. दुपार होऊ लागली तरीही पिंडी काही दुधात बुडेना ! कोणी राहिले का म्हणून परत दवंडी पिटवली गेली आणि त्याचवेळी त्या गावातील एक वयस्कर, समाधानी दिसणारी आजी हातात नातवाचे बोट धरीत, दुसऱ्या हातात थोडे फुलपात्र भर नजरा तिच्यावर वळल्या. त्या साऱ्या नजरांकडे संपूर्ण दुर्लक्ष करून आजीने, मनोभावे प्रार्थना करून ते इवलेसे दूध अभिषेक पात्रात ओतले .......ओतले मात्र! आणि काय चमत्कार ! शंकराची पिंडी त्या दुधाने पूर्णपणे बुडून गेली. राजासह सारे आश्चर्याने थक्क झाले. स्वतः राजा नतमस्तक झाला तरीही त्याने तिचे उशीरा व तेही पेलाभर दूध आणण्याबद्दलची पृच्छा केली. त्यावर तिने सांगितले की, स्नान करून, पूजा-अर्चा करून घरच्या देवांना दुधाचा नैवेद्य दाखवून, घरातल्या मुलाबाळांना, कुत्र्यांना, मांजरांना त्यांच्या गरेजेचे दूध पाजून आपली कौटुंबिक नित्यकर्मे करून मग ती देवळात आली होती. राजाला व सर्वानाच त्यांच्या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळाली होती. त्याच क्षणी बाहेर वीज कडाडली व ईश्वर कृपेची बरसात राज्यावर बरसू लागली. सारे त्या आनंदात भिजून चिंब झाले.

**प्रश्न :**

(i) राजाकडे कोणती गंभीर समस्या निर्माण झाली होती ? त्यासाठी त्याने काय केले ? [2]

(ii) राजाने आपल्या प्रजेला कोणते आवाहन केले ? त्याचा परिणाम काय झाला ? [2]

(iii) आजीकडे कुत्सित नजरेने बघणाऱ्या लोकांच्या नजरेत कधी व कसा बदल झाला ? [2]

(iv) आजीबाईना देवळात यायला उशीर का झाला ? [2]

(v) प्रस्तुत कहाणीतून प्रजेला, राजाला व आपल्याला कोणता विचार मिळतो ? [2]

**Question 4**

Choose the correct answer from the options given :- [8]

दिलेल्या पर्यायांतून अचूक उत्तराची निवड करा :-

(i) मांजर व घोडी यांचे लिंग बदलल्यास अनुक्रमे उत्तर पुढीलप्रमाणे असेल.

(a) मांजरी, घोडा (b) भाटी व घोडा (c) बोका व घोडा (d) मांजरे, घोडे

(ii) खालील प्रमाणे एकवचनी शब्द कोणता.

(a) चष्मे (b) केळी (c) आंबे (d) सूर्य

(iii) राजा व सूर्य शब्दांचे समानार्थी शब्द अनुक्रमे -

(a) राजेश, नरेश (b) नरेश, भास्कर (c) नरेश, सुरेश (d) भास्कर, नरेश

(iv) खालीलपैकी योग्य विरूद्धार्थी शब्दांची जोडी कोणती ?

(a) खाजगी × सार्वजनिक (b) विचार × आचार (c) खरे × सत्य (d) लांब × दूर

(v) तू नक्कीच यशस्वी होशील : - काळ ओळखा.

(a) वर्तमानकाळ (b) भविष्यकाळ (c) भूतकाळ (d) मिश्रकाळ

(vi) दरवाजा बंद कर - वाक्य प्रकार ओळखा.

(a) आज्ञार्थी वाक्य (b) विधानार्थी वाक्य (c) प्रश्नार्थी वाक्य (d) उद्गारार्थी वाक्य

(vii) खोटेपणा उघडकीस आल्यावर रमेशची ........... अशी गत झाली.

(a) सासू बोले सुने लागे (b) नावडतीचे मीठ अळणी

(c) इकडे आड तिकडे विहीर (d) उतावळा नवरा गुडघ्याला बाशिंग

(viii) दुसऱ्यावर आरोप करताना आपण प्रथम खात्री करून घ्यावी योग्य वाक्यप्रचार लिहा.

(a) विडा उचलणे (b) जिवापाड जपणे (c) शहानिशा करणे (d) काककृष्टीने पाहणे

## SECTION - B

*(Attempt **four** questions from this **Section**.)*
*(You must answer at least **one** question from each of the **two** books, you have studied and any **two** other questions.)*

## कथाकुंज

### KATHAKUNJ (Katha Sankalan - Short Stories)

**Question 5**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :-
खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :-

> पांढरा ढग भांबावून गेला. त्याने विचारले,
> “कुणाला मिळाली ती स्वर्गातली जागा ?”
> “एका काळया ढगाला,” रक्षक उत्तरला.
> “काळया ढगाला ? ”
> “हो तापून गेलेल्या पृथ्वीला शांत करण्याकरिता त्यानं आपलं जीवनसर्वस्व दिलं.” आकाशवाणी झाली.

*दोन मेघ*

(i) पांढऱ्या ढगाने स्वतःकडे निराशेने का पाहिले ? लवकरच तो ही निराशा का विसरला ? [2]

(ii) पांढऱ्या ढगाने वळून खाली पाहताच त्याला कोणते दृश्य दिसले ? [2]

(iii) पांढरा ढग भांबावून का गेला ? [3]

(iv) पांढरा ढग व काळा ढग ही कोणाची प्रतिके आहेत ? स्वर्गात स्थान कसे मिळते ? [3]

**Question 6**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :-
खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :-

> जगमोहनचा काका माझा जवळचा मित्र होता, तो जगमोहनविषयी नेहमी सांगायचा. जगमोहन आणि त्याची आई खेतवाडीत कुठ तरी रहायचे.

*वेग*

(i) जगमोहनने कॉलेज सोडण्याचा निर्णय का घेतला ? [2]
(ii) स्वीडिश कंपनीची एजन्सी जगमोहनने का व कशी मिळाली ? [2]
(iii) जगमोहन का स्फुंदू लागला ? [3]
(iv) लेखन जगमोहनच्या घरी का गेले ? [3]

**Question 7**
Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :-
खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :-

"आत येऊ का साहेब ?"
बाहेरून आलेल्या आवाजामुळे दादा भानावर आले. त्यांनी पुन्हा एकदा चष्मा नीट केला.
"या ना, या अवश्य या." त्यांनी समोर आलेल्या दोघांना अतिशय नम्रतेनं आत बोलावलं, खुर्चीत बसण्यास सांगितले.
दोघांनीही हातातील भल्यामोठ्या पिशव्या बाजूला ठेवल्या. दादांना त्यांनी नमस्कार केला. दोघेही खुर्चीत बसले.

*पुण्य*

(i) फटांक्यांचा आवाज ऐकूनही मुलांची सुस्ती दूर का होत नव्हती ? [2]
(ii) दिवाळीच्या दिवशी मुलांनी काय काय खाल्ले हाते ? [2]
(iii) मध्यरात्री अनाथाश्रमात काय घडले ? [3]
(iv) हिरालाल आणि माणिकलाल यांनी दादांचे आभार का मानले ? [3]

## काव्यांगण

### KAVYANGAN (Kavya Sankalan - Poetry)

**Question 8**
Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :-
खालील कवितेच्या ओळी वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :-

झुळकन् सुळकन् इकडुन तिकडे तिकडे किति दुसरी उडती ?
हिरे, माणके, पांचू फुटुनि पंखचि गरगरती !
पहा पाखरें चरोनि होती झाडांवर गोळा
कुठे बुडाला पलीकडील तो सोन्याचा गोळा ?

*सायंकाळची शोभा*

(i) 'सायंकाळची शोभा' या कवितेत कवीने ओढयाचे आणि झाडांचे वर्णन कसे केले आहे ? [2]
(ii) कुरणांवर पडलेली सूर्याची किरणे पाहून कवीला काय वाटते ? कवीने शेतीचे वर्णन कसे केले आहे ? [2]
(iii) पिकांवर बसलेली फुलपाखरे पाहून कवी कोणती कल्पना करतो ? फुलपाखरांना 'अचल' म्हटले आहे ? [3]
(iv) 'पहा पाखरे चरोनी होती झाडावर गोळा कुठे बुडाला पलीकडिल तो सोन्याचा गोळा' ? - प्रस्तुत ओळींच स्पष्टीकरण लिहा. [3]

**Question 9**
Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :-
खालील कवितेच्या ओळी वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :-

नसे राऊळी वा नसे मंदिरी,
जिथे राबती हात तेथे हरी ।

*जिथे राबती हात*

(i) कवी मुरारी कुठे नांदतो असे म्हणतात ? [2]
(ii) विश्वकर्मा कशाचा पुजारी आहे असे कवी म्हणतो ? [2]
(iii) कवीने या कवितेतून कर्मयोगाचा मंत्र कसा दिला आहे ? [3]
(iv) कविला ईश्वराचे अस्तित्व कोठे व कसे जाणवते ? [3]

**Question 10**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :-

खालील कवितेच्या ओळी वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :-

> माझा मराठी गुलाल त्याला अबीराचा वास
> माझ्यासाठी चंद्रभागा उरी कालवते घास
> खोलवर रूजे नाळ
> सळसळतो आतून माझ्या रक्तात पिंपळ

*माझा मराठीचा बोल*

(i) कवीच्या मते मराठी माऊलीला कोणाकोणाची सावली लाभली ? कशी ? [2]

(ii) मराठीचा गुलाल कसा आहे ? [2]

(iii) 'चंद्रभागा उरी कालवते घास' - प्रस्तुत ओळी स्पष्ट करा. [3]

(iv) 'सळसळणारा पिंपळ' - यातून कवीला कोणत्या भावना व्यक्त करायच्या आहेत ? [3]

## करूणाष्टक

## KARUNASTAK (Kadambari - Novel)

**Question 11**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :-

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :-

> .... की मला वाटायचं, हीच आपली आई असती, तर किती चांगलं झालं असतं ! -----
> मावशीची दोन मुलं आणि आम्ही तीन भाऊ असे पाच ह्या घरात हैदोस घालायचो.
> मावशीची म्हातारी सोवळी सासू भयंकर वैतागाने म्हणायची, "ह्या वनाबाईची पोरं नलिस्त, नलिस्त !"
> - आणि पार परसदारी तुळशीकट्ट्यावर जाऊन बसायची. आम्ही दुष्ट होतोच. सगळया घरात आम्ही गोंधळ घालायचो.

(i) 'हीच आपली आई असती, तर किती चांगलं झालं असतं ! असे लेखकाला कोणासंदर्भात वाटले होते ? का ? [2]

(ii) नाना कोण होते ? त्यांचा वाडा, त्यांची श्रीमंती कसा दर्शवत होता ? [2]

(iii) नानांचे व्यक्तिमत्व लेखकाने कसे वर्णिले आहे ? [3]

(iv) म्हातारी सोवळी सासू मुलांवर का वैतागत असे ? [3]

**Question 12**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :-

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :-

> मग आजी चंपाषष्ठी कधी येते हे बोटांवर मोजत राहायची.
> या गावी पाण्याचे फार हाल होते. ओढयाला बारा महिने काही पाणी रहात नसे. मग ओढयाच्या पात्रात जागोजागी खोल झरे काढून त्यावर गावकरी लाकडी पिंप बसवत. पिंपाच्या चोहोबाजूंना दगडविटा, वाळू घालून तात्पुरती अशी लहान विहीरच केली जाई. या पिंपाभोवती पितळी लोखंडी घागरीचा, हंडयाचा वेढा पडायचा.

(i) आईने पाण्याच्या बाबतीत कोणता धसका घेतला होता ? त्यासाठी ती काय करत असे ? [2]

(ii) मध्यरात्री पाण्यासाठी उठलेल्या आईने कोणाला पाहिले ? पाहताच तिला हुडहुडी का भरली ? [2]

(iii) आईला बसलेली नागाची भीती पुढे कोणी व कशी दूर केली ? [3]

(iv) विठूकाका कोण होते ? त्यांनी आईला कोणता सल्ला दिला ? [3]

**Question 13**
Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :-
खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :-

आपलं गाव सोडून बेलदाराप्रमाणे पोटामागं हिंडणं हे तिला मुळीच आवडायचं नाही; पण तिचा आत्मविश्वासही मोठा होता. म्हणायची, "आज माझी पोरं लहानधाकटी आहेत, तोवर मला सगळे सोसलं पाहिजे. उदया, मोठी झाली, म्हणजे ती मला सोन्यारूपाने न्हाऊ घालतील ! माझीच पोरं आहेत ती, .......
'ओढयाकाठचं हे अपेशी घर नको, नको !" असं आई सारखं घोकत असे.

(i) 'ओढयाकाठचं अपेशी घर नको ! असे आई का म्हणत होती ? [2]
(ii) यावर वडिलांचे मत काय होते ? [2]
(iii) ओढयाकाठच्या घरात आईला कोणता भयंकर आजार झाला ? त्यावर तिने कोणकोणते उपाय केले ? [3]
(iv) "किती काळ मी हे सहन करू ?" असे आई कशासंदर्भात म्हणे ? का ? त्याचा मुलांवर काय परिणाम होई ? [3]

## रंगस्पर्श - एकांकिका संकलन

### RANGSPARSH (Ekankika Sankalan)

**Question 14**
Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :-
खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :-

त्रिंबक : हिला घेवून मी नाटकाला गेलोय - अगदी आमच्या तरूणपणाचं चित्र दिसतं. बुट्टयाची पैठणी ही नेसलीय. गंधर्वांचं 'स्वयंवर ' बघायला गेलोत आम्ही ! (मोठयांदा हसतात) . आश्चर्य वाटतं म्हणजे मी एकही नाटक पाहिलेलं नाही - मघा तुम्हाला सांगितलंच - 'स्वयंवर नाटक नि गंधर्वांचं नाव ऐकत होतो पूर्वी इतकंच !

डॉक्टर : हं अस्स ? आणखी ?

त्रिंबक : दुसरं नेहमी दिसणारं स्वप्न म्हणजे, वासू बी.ए., एल.एल.बी झालाय.

*घर*

(i) 'त्रिंबकरावांकडून वासूच्या बाबतीत कोणता अन्याय घडला होता ? [2]
(ii) त्रिंबकरावांना सुट्टी घेवून घरी राहण्याची काळजी का वाटत नव्हती ? [2]
(iii) त्रिंबकरावांच्या घराच्या वेडाची धग जानकीबाईंना कशी लागली ? थोडक्यात स्पष्ट करा. [3]
(iv) त्रिंबकरावांनी कोणता ध्यास घेतला होता ? त्याचा त्यांच्यावर काय परिणाम झाला ? [3]

**Question 15**
Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :-
खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :-

मराठे : (तिकडे पाहत) हो, का ?

भोळे : काही नाही. (किंचित थांबून) शकू तिथं बसत होती.

मराठे : हूं (दोघेही पाहत राहतात)

भोळे : बघितलं की आठवण येते. तुला येते का रे ?

*चार दिवस*

(i) शकू दिसायला व स्वभावाने कशी होती ? [2]
(ii) शकूविषयी ऑफिसात चर्चा का रंगली होती ? [2]
(iii) 'मी आता खूप सुखी होणार असे कोण म्हणाले ? का ? [3]
(iv) नोटिस मिळाल्यामुळे शकूवर काय परिणाम झाला होता ? [3]

**Question 16**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :-

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :-

> बाई : (अजून छाती धडधडतेच आहे.) छे ! कलकलणी सुरू झाली. आता काय आहे नि काय गेलं हेसुद्धा कळायचं नाही.
>
> शास्त्री : कपाट बघ उघडून आधी.
>
> बाई : उघडून कशाला ? उघडंच आहे .
>
> शास्त्री : (स्वतः कॉटखाली पाहत) काही गेलं का पहा !
>
> बाई : अग्गबाई, ..........
>
> *चोरी झालीच नाही*

(i) शास्त्री पती - पत्नी कोठे गेले होते ? घरी परतल्यावर त्यांच्या नजरेस कोणते दृश्य पडले ? त्यातून त्यांना कोणती खात्री पटली ? [2]

(ii) त्यासाठी शास्त्रींनी बाईंस जबाबदार का ठरवले ? यावर बाईंची प्रतिक्रिया कास होती ? [2]

(iii) घरातील कपाट उघडे का होते ? त्याबाबत बाईंनी शास्त्रींना जबाबदार का ठरवले ? [3]

(iv) यावर शास्त्रींनी कोणते मतप्रदर्शन केले ? त्यातही त्यांनी स्वतःविषयीचा कोणता मोठेपणा मिरविला ? [3]